IDFC FIRST Bank

ALWAYS YOU FIRST

# आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्ड्स

# सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती (एमआयटीसी)

इथे दिलेल्या सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती आणि आणि सर्व तपशील क्रेडिट कार्ड सभासद/ क्रेडिट कार्डाचे निवेदक/ कर्मचारी/ बँकेचे ग्राहक/बँकेच्या क्रेडिट कार्ड उत्पादनात तात्काळ रुची दाखवणारे जनतेचे सभासद या सर्वांना लागू होतात. एमआयटीसी बदलाच्या अधीन आहेत. सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्ड सभासद अटी आणि शर्ती www.idfcfirstbank.com वर दिल्या गेलेल्या करारासह वाचाव्यात आणि समजून घ्याव्यात.

## शुल्क सूचीपत्र: आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्ड्स

5 एप्रिल,2022पासून प्रभावी

### 1 प्रवेश फी, वार्षिक फी आणि ॲड ऑन कार्ड फी

| आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड प्रकार | आरंभ/प्रवेश फी (₹) | वार्षिक फी (₹) | ॲड-ऑन कार्ड फी (₹) |
|---|---|---|---|
| फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट वेल्थ क्रेडिट कार्ड<br>एंप्लॉई क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट वाव! क्रेडिट कार्ड | शून्य | शून्य | शून्य |
| इमेज पर्सनलाइझ फी* | ₹499 | शून्य | ₹499 |
| फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड | ₹50,000 | ₹50,000 | 1ले ॲड-ऑन- शून्य<br>2रे ॲड-ऑन आणि पुढे<br>प्रति ॲड-ऑन 4000 ₹ |

*इमेज पर्सनलायजेशन गुणविशेष फर्स्ट प्रायव्हेटसाठी लागू होत नाही

### 2 . वित्त शुल्क*

| आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड प्रकार | खरेदी, रोख अग्रिम रक्कम आणि देय असलेल्या थकबाकी शेष रकमांवरचा व्याज दर (जर पेमेंट देय असलेली किमान रक्कम आणि थकबाकी असलेल्या एकूण रकमेचे मूल्य यांच्या दरम्यान असल्यास आकारले जाईल) | थकबाकी व्याज (किमान देय रक्कम (एमएडी) भरपाईच्या अंतिम दिनांकावर न दिले गेल्यास आकारले जाईल) |
|---|---|---|
| फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट वेल्थ क्रेडिट कार्ड<br>एंप्लॉईज क्रेडिट कार्ड<br>फर्स्ट वाव! क्रेडिट कार्ड | मासिक दर –<br>0.75% – 3.5%<br>वार्षिक दर –<br>9% – 42% | मासिक दर – 3.99%<br>वार्षिक दर – 47.88% |
| फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड | मासिक दर – 0.75%<br>वार्षिक दर – 9% | मासिक दर – 0.75%<br>वार्षिक दर – 47.88% |

### 3. इतर फी आणि शुल्क

| | |
|---|---|
| अग्रिम रक्कम- व्यवहार फी ** | ₹250 |

| | |
|---|---|
| उशीरा भरपाई केल्याचे शुल्क | फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड, फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड, फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड, एंप्लॉई क्रेडिट कार्ड, फर्स्ट वाव! क्रेडिट कार्ड, फर्स्ट वेल्थ क्रेडिट कार्ड– थकबाकी असलेल्या एकूण रकमेच्या 15% ( किमान 100₹ आणि कमाल 1250 ₹, असण्याच्या अधीन आहे) फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड– शून्य |
| ओव्हर–लिमिट शुल्क | ओव्हर लिमिट किंवा मर्यादे पलिकडच्या रकमेवर 2.5% (किमान 500 ₹ शुल्काच्या अधीन आहे), फर्स्ट प्रायव्हेट कार्डसाठी शून्य, फर्स्ट वाव! क्रेडिट कार्डासाठी लागू होत नाही. |
| चेक न वठणे/ ऑटो डेबिट/ पेमेंट रिटर्न | न वठलेला प्रत्येक चेक / प्रत्येक ऑटो डेबिट/ प्रत्येक पेमेंट रिटर्न वर 250 ₹, |
| रिवॉर्ड विमोचन फी | शून्य (दिनांक 1 ऑक्टोबर 2022 पासून विमोचन केलेल्या प्रत्येक व्यवहारावर 99 ₹.) |
| शाखेत केलेल्या रोख भरपाईवरील फी | शून्य |
| आउटस्टेशन चेक प्रक्रिया फी | शून्य |
| नक्कल विवरण विनंती | शून्य |
| कार्ड बदलण्याची फी | फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड, फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड, फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड, एंप्लॉई क्रेडिट कार्ड, फर्स्ट वाव! क्रेडिट कार्ड, फर्स्ट वेल्थ क्रेडिट कार्ड– 100 ₹ इमेज पर्सनलायजेशन असलेल्या कार्डांसाठी 149 ₹ लागू होतात, फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड–4000 ₹, |
| चेक/रोख प्रक्रिया फी | शून्य |
| चार्जस्लिप विनंती | शून्य |
| परदेशी चलन व्यवहारावरचे मार्कअप शुल्क | फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड, फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड–3.5%, फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड, एंप्लॉई क्रेडिट कार्ड–1.99%, फर्स्ट वेल्थ क्रेडिट कार्ड– 1.5% फर्स्ट वाव! क्रेडिट कार्ड, फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड– शून्य |
| ईएमआय फी | व्यवहाराच्या मूल्याच्या 1% (किमान 99 ₹) |
| फ्युएल सरचार्ज व्हेवर^ | व्यवहार मूल्याच्या 1% सरचार्ज व्हेवर –200 ₹ पर्यंत प्रति विवरण सायकल फर्स्ट मिलेनिआ क्रेडिट कार्ड, फर्स्ट क्लासिक क्रेडिट कार्ड, फर्स्ट वाव! क्रेडिट कार्डावर सरचार्ज व्हेवर–300 ₹ पर्यंत प्रति अहवाल सायकल फर्स्ट सिलेक्ट क्रेडिट कार्ड, एंप्लॉई क्रेडिट कार्ड, सरचार्ज व्हेवर –400 रु. प्रति अहवाल फर्स्ट वेल्थ कार्ड, फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्डवर |
| गुड्स अँड सर्विस टॅक्स (जीएसटी) | भारत सरकारने सूचित केलेल्या दराने, सध्या सर्व फी आणि व्याज व इतर शुल्कांवर 18% लागू आहे आणि तो बदलाच्या अधीन आहे. |

* कार्डधारकासाठी लागू असलेले वित्त (व्याज) दर बँकेच्या अंतर्गत धोरण मानकांवर आधारीत आहेत. ते अंतिम असतील आणि बंधनकारक असतील, तसेच बँकेच्या निर्णयाप्रमाणे बदलाच्या अधीन असतील’

** बिल केलेली आंतरराष्ट्रीय रक्कम रुपयांमध्ये डीसीसीमार्फत डायनॅमिक करन्सी रुपांतरणाप्रमाणे (म्हणजेच काही विशिष्ट आंतरराष्ट्रीय व्यापारी आउटलेट्स/एटीएममध्ये दिली जाणारी सेवा ज्यामध्ये कार्ड सभासदाला परदेशी चलनामध्ये केलेल्या व्यवहाराला स्थानिक चलनात म्हणजेच भारतीय रुपयांमध्ये विड्रॉवल/विक्री स्थळावर रुपांतरीत करण्याची मुभा असते) रुपांतरणानंतर प्राप्तिकर्ता बँक किंवा सेवा प्रदात्यामार्फत आकारली गेलेली फी/शुल्क समाविष्ट होऊ शकते.

^ इंधन व्यवह्मावरचा सरचार्ज प्राप्तिकर्त्याद्वारे ( टर्मिनल/पेमेंट गेटवे देणारी व्यापा–याची बँक) आकारला जातो. फ्युएल सरचार्ज व्हेवर पात्र इंधन व्यवहार रकमांच्या 1% ने कॅप्र केला जाईल. फ्युएल सरचार्जवरचा सीएसटी प्रतिक्रमित (रिवर्स्ड) केला जाणार नाही. चार्जस्लिपचे मूल्य क्रेडिट कार्ड विवरणाप्रमाणे बदलेल कारण व्यवहारानंतर प्राप्तिकर्ता बँकेमार्फत सरचार्ज इटी जीएसटी आकारला जातो. पात्र व्यवहारांसाठी 1% सरचार्ज व्हेवर (जीएसटी वगळून) मासिक क्रेडिट कार्ड व्यवहारामध्ये वेगळा दाखवला जाईल.

## 1. फी आणि शुल्के

### i. वार्षिक आणि नूतनीकरण सभासदत्व फी

फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड वगळता, सर्व कार्ड व्हेरिएंट्सवर वार्षिक आणि नूतनीकरण सभासदत्व फी शून्य आहे. फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड लागू असल्याप्रमाणे कार्ड देतेवेळी कार्डधारकाला कळवली जाईल. फर्स्ट प्रायव्हेट ॲड-ऑन क्रेडिट कार्ड- फर्स्ट ॲड-ऑन वितरण कॉम्प्लिमेंटरी आहे, दुसऱ्या ॲड-ऑनपासून प्रति ॲड-ऑन 4000 ₹ आकारले जातील.

### ii. अग्रिम रक्कम फी

कार्ड सभासद आपात्काळात भारतातील किंवा परदेशातील एटीएममधून रोख रक्कम काढण्यासाठी कार्डाचा उपयोग करु शकतो. शुल्क सूचीपत्रात देण्यात आलेली 250 ₹ व्यवहार फी आकारली जाईल आणि पुढील विवरणामध्ये कार्ड सभासदाला बिल केली जाईल. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सार्वभौम निर्णयानुसार फी बदलाच्या अधीन असून याबद्दल कार्ड सभासदाला पूर्वसूचना दिली जाईल आणि बँकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या शुल्क सूचीपत्रामार्फत जाहिर केले जाईल.

### iii. उशीरा भरपाईवरील शुल्क

कार्डावरील किमान देय थकबाकी रक्कम भरपाईच्या अंतिम दिनांकावर न भरली गेल्यास उशीरा भरपाईवरील शुल्क (एलपीसी) लागू केले जाईल. उशीरा भरपाईवरील शुल्क आधीच्या विवरणाप्रमाणे कार्डावरील एकूण थकबाकी रकमेच्या आधारावर आकारले जाते. उशीरा भरपाईवरील शुल्क टाळण्यासाठी भरपाईच्या अंतिम दिनांकावर किंवा त्याआधी आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड खात्यावर स्पष्ट रक्कम क्रेडिट होणे आवश्यक आहे. सध्या थकबाकी रकमेवर किमान 100 ₹ आणि कमाल 1250 ₹ सह थकबाकी रकमेच्या 15% एलपीसी आकारले जाते. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सार्वभौम निर्णयानुसार शुल्क बदलाच्या अधीन असून याबद्दल कार्ड सभासदाला पूर्वसूचना दिली जाईल आणि बँकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या शुल्क सूचीपत्रामार्फत जाहिर केले जाईल.

उशीरा भरपाईवरील शुल्क स्पष्टीकरण

| थकबाकी असलेली एकूण रक्कम | उशीरा भरपाईवरील शुल्क |
|---|---|
| ₹100 पेक्षा कमी | शून्य |
| ₹500 | ₹100 |
| ₹5000 | ₹750 |
| ₹8000 | ₹1200 |
| ₹10000 | ₹1250 |
| ₹10000 पेक्षा जास्त | ₹1250 |

फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्डावर एलपीसी शून्य आहे.

### iv. वित्त शुल्क (व्याज शुल्क)

अ) जर कार्ड सभासदाची आधीची देय थकबाकी किंवा देय असलेली एकूण थकबाकी भरपाईच्या दिनांकावर भरली न जाण्याच्या स्थितीत वित्त (व्याज) शुल्क आकारले जाईल. कार्ड सभासदाने त्याची शेष रक्कम संपूर्णपणे न भरण्याची निवड केल्यास, या रकमेचा परतावा केला जाईपर्यंत, व्यवहाराच्या दिनांकापासून सर्व व्यवहारांवर (रोख अग्रिम रकमेला आंतर्भूत करुन) मासिक टक्केवारी दराने व्याज शुल्क आकारले जाईल. व्याज शुल्क, जर देय असेल तर कार्ड सभासदाच्या खात्यामधून कार्डावरील थकबाकी रकमेचा संपूर्ण परतावा होईपर्यंत डेबिट केले जाईल. जर कार्ड सभासदाने अंतिम दिनांकावर किंवा त्याआधी आधीच्या बिलाची रक्कम न भरण्याच्या स्थितीत दैनंदिन उपार्जन (ॲक्रुरल) तत्वावर व्याज आकारले जाईल. व्याज व्यवहाराच्या दिनांकापासून त्याचा निवाडा होण्याच्या दिनांकापर्यंत आकारले जाईल.

ब) जेव्हा कार्ड सभासद कोणतीही थकबाकी रक्कम पुढे नेतो, तेव्हा वित्त शुल्क ॲव्हरेज डेली बॅलन्स पध्दतीने गणन केले जाते, ते आधीच्या थकबाकीची संपूर्ण भरपाई होईपर्यंत पुढे आणल्या गेलेल्या शेष रकमेवर आणि नवीन बिलिंग्जवर आकारले जाईल.

क) वित्त (व्याज) दर वैविध्यपूर्ण असून ते कार्ड सभासदाचा क्रेडिट इतिहास, खरेदीच्या पध्दती, भरपाई करण्याचे वर्तन, उपयोगाच्या पध्दती, प्रामाणिकपणा, व्हिंटेज आणि बँकेच्या अंतर्गत धोरण मानकांसाठी घटकांवर आधारलेले असते, पण त्यापुरते मर्यादित नसते. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सार्वभौम निर्णयानुसार वित्त (व्याज) दरमहा 3.99% पर्यंत (47.88%ऍन्युअलाइझ्ड) बदलू/वाढू शकतात किंवा दरमहा 0.75% पर्यंत (9.00% ऍन्युअलाइझ्ड) बदलू/कमी होऊ शकतात आणि ते कार्ड सभासदासाठी अंतिम व बंधनकारक असतील.

ड) जर कार्ड सभासद आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्डाची रिव्हॉल्विंग क्रेडिट सुविधा वापरत असेल आणि त्यामुळे मासिक बिलिंग विवरणात दिल्या गेलेल्या एकूण थकबाकी रकमेपेक्षा कमी रकमेची भरपाई करण्याची निवड करत असल्यास, थकबाकी असलेल्या संपूर्ण रकमेवर वित्त शुल्क लागू केले जाईल त्याचप्रमाणे रोख अग्रिम रकमेला आंतर्भूत करुन सर्व नवीन व्यवहारांवर देखील आधीच्या थकबाकी रकमेचा संपूर्ण परतावा होईपर्यंत वित्त शुल्क लागू होईल. कृपया याची नोंद घ्यावी की आधीच्या विवरणानुसार असलेले क्लोजिंग बॅलंस सर्व नवीन खरेद्या/रोख विड्रॉवलसह थकबाकी असलेल्या रकमेचा संपूर्ण परतावा केला जाण्याच्या दिनांकापर्यंत व्याज उपार्जित (ऍक्क्रु) करतील, त्यात क्रेडिट कार्डावरील कर्जासाठीच्या कोणत्याही बिल केलेल्या ईएमआय आंतर्भूत असतील.

इ) दुसऱ्या क्रेडिट कार्ड खात्यामधून बॅलन्स स्थानांतरण झाल्याच्या स्थितीत, स्थानांतरीत रकमेवर बँकरचा चेक वितरण केलेल्या/ एनइएफटी केल्याच्या दिनांकापासून त्याचप्रमाणे तुमच्या क्रेडिट खात्यावर थकबाकी असलेल्या कोणत्याही खरेदीच्या रकमेवर वित्त शुल्क तात्काळ उपार्जित (ऍक्क्रु) होईल.

फ) वर दिलेले वित्त शुल्क कार्ड खाते बंद केल्यावर देखील कार्डावरील थकबाकीचा संपूर्ण परतावा होईपर्यंत देय असणे सुरु राहिल

<u>व्याज आणि शुल्क गणनासाठी स्पष्टीकरण केलेले उदाहरण</u>

**स्पष्टीकरण 1**

खाली दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये किमान देय रक्कम भरपाईच्या अंतिम दिनांकावर भरली न जाण्याच्या स्थितीतील विविध शुल्कांचे गणन करण्याची पध्दत दाखवण्यात आली आहे. असे गृहित धरुया की, कार्ड सभासदाने आधीची थकबाकी रक्कम संपूर्णपणे परत केली आहे आणि त्याच्या कार्ड खात्यात कोणतीही रक्कम थकबाकी नाही. विवरणाचा दिनांक 24 नोव्हेंबर आहे आणि थकबाकी अंतिम दिनांक 12 डिसेंबर आहे. कार्ड खात्यात केलेल्या व्यवहाराची खाली सूची दिलेली आहे..

| दिनांक | व्यवहार | रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| 10-नोव्हेंबर | कपडे खरेदी | ₹15000 | ₹15000 |
| 15-नोव्हेंबर | एटीएममधून विड्रॉवल | ₹5000 | ₹20000 |
| 15-नोव्हेंबर | रोख अग्रिम रक्कम फी (करासह) | ₹295 | ₹20295 |
| 18-नोव्हेंबर | किराणा खरेदी | ₹6000 | ₹26295 |
| 24-नोव्हेंबर | विवरण दिनांक | थकबाकी असलेली एकूण रक्कम<br>किमान देय रक्कम | ₹26295<br>₹1595 |
| 12-डिसेंबर | | भरपाईचा अंतिम दिनांक | |
| 13-डिसेंबर | उशीरा भरपाईवरील शुल्क (करांसह) | ₹1475 | ₹27770 |
| 18-डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | ₹2000 (क्रेडिट) | ₹25770 |
| 20-डिसेंबर | वीज बिल भरपाई | ₹1000 | ₹26770 |
| 22-डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | ₹18000 (क्रेडिट) | ₹8770 |

24 डिसेंबर (म्हणजेच पुढील विवरण दिनांकापर्यंत) पुढे कोणतीही भरपाई केली गेली नाही. कार्डावरचा थकबाकी व्याज दर 47.88% प्रति वर्ष, व्याज आणि शुल्क खालीलप्रमाणे लागू केले जाईल:

अ) व्याज शुल्क

| थकबाकी रक्कम | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | दिवसांची संख्या | व्याज शुल्क |
|---|---|---|---|---|
| ₹15000 | 10–नोव्हेंबर | 14–नोव्हेंबर | 5 | ₹98.38 |
| ₹20295 | 15–नोव्हेंबर | 17–नोव्हेंबर | 3 | ₹79.87 |
| ₹26295 | 18–नोव्हेंबर | 12–डिसेंबर | 25 | ₹862.33 |
| ₹27770 | 13–डिसेंबर | 17–डिसेंबर | 5 | ₹182.14 |
| ₹25770 | 18–डिसेंबर | 19–डिसेंबर | 2 | ₹67.61 |
| ₹26770 | 20–डिसेंबर | 21–डिसेंबर | 2 | ₹70.23 |
| ₹8770 | 22–डिसेंबर | 24–डिसेंबर | 3 | ₹34.51 |
| | | एकूण व्याज शुल्क | | ₹1395.08 |

ब) जीएसटी व्याज शुल्कावर @18%– 251.12 ₹

क) एकूण थकबाकी रक्कम – 8770 ₹

त्यामुळे दिनांक 24 डिसेंबरच्या विवरणामधली एकूण थकबाकी रक्कम (अ) + (ब) + (क) = 10416.20 ₹

**स्पष्टीकरण 2**

खाली दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये किमान देय रक्कम भरपाईच्या अंतिम दिनांकावर भरली न जाण्याच्या स्थितीतील विविध शुल्कांचे गणन करण्याची पध्दत दाखवण्यात आली आहे. असे गृहित धरुया की, कार्ड सभासदाने आधीची थकबाकी रक्कम संपूर्णपणे परत केली आहे आणि त्याच्या कार्ड खात्यात कोणतीही रक्कम थकबाकी नाही. विवरणाचा दिनांक 24 नोव्हेंबर आहे आणि थकबाकी अंतिम दिनांक 12 डिसेंबर आहे. कार्ड खात्यात केलेल्या व्यवहाराची खाली सूची दिलेली आहे..

| दिनांक | व्यवहार | रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| 10–नोव्हेंबर | कपडे खरेदी | ₹15000 | ₹15000 |
| 15–नोव्हेंबर | एटीएममधून विड्रॉवल | ₹5000 | ₹20000 |
| 15–नोव्हेंबर | रोख अग्रिम रक्कम फी (करासह) | ₹295 | ₹20295 |
| 18–नोव्हेंबर | किराणा खरेदी | ₹6000 | ₹26295 |
| 24–नोव्हेंबर | विवरण दिनांक | थकबाकी असलेली एकूण रक्कम<br>किमान देय रक्कम | ₹26295<br>₹1595 |
| 12–डिसेंबर | | भरपाईचा अंतिम दिनांक | |
| 12–डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | –₹1595 | ₹24700 |
| 18–डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | –₹2000 | ₹22700 |
| 20–डिसेंबर | वीज बिल भरपाई | –₹1000 | ₹23700 |
| 22–डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | –₹18000 | ₹5700 |

24 डिसेंबर (म्हणजेच पुढील विवरण दिनांकापर्यंत) पुढे कोणतीही भरपाई केली गेली नाही. कार्डावरचा थकबाकी व्याज दर 36% प्रति वर्ष, व्याज आणि शुल्क खालीलप्रमाणे लागू केले जाईल:

अ) व्याज शुल्क

| थकबाकी रक्कम | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | दिवसांची संख्या | व्याज शुल्क |
|---|---|---|---|---|
| ₹15000 | 10–नोव्हेंबर | 14–नोव्हेंबर | 5 | ₹73.97 |
| ₹20295 | 15–नोव्हेंबर | 17–नोव्हेंबर | 3 | ₹60.05 |
| ₹26295 | 18–नोव्हेंबर | 11–डिसेंबर | 24 | ₹622.44 |
| ₹24700 | 12–डिसेंबर | 17–डिसेंबर | 6 | ₹146.17 |
| ₹22700 | 18–डिसेंबर | 19–डिसेंबर | 2 | ₹44.78 |
| ₹23700 | 20–डिसेंबर | 21–डिसेंबर | 2 | ₹46.75 |
| ₹5700 | 22–डिसेंबर | 24–डिसेंबर | 3 | ₹16.87 |
| | | एकूण व्याज शुल्क | | ₹1011.02 |

ब) जीएसटी व्याज शुल्कावर @18%- 181.98 ₹

क) एकूण थकबाकी रक्कम - 5700 ₹

त्यामुळे दिनांक 24 डिसेंबरच्या विवरणामधली एकूण थकबाकी रक्कम (अ) + (ब) + (क) = 6893 ₹

**स्पष्टीकरण 3**

खाली दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये किमान देय रक्कम भरपाईच्या अंतिम दिनांकावर भरली न जाण्याच्या स्थितीतील विविध शुल्कांचे गणन करण्याची पध्दत दाखवण्यात आली आहे. असे गृहित धरुया की, कार्ड सभासदाने आधीची थकबाकी रक्कम संपूर्णपणे परत केली आहे आणि त्याच्या कार्ड खात्यात कोणतीही रक्कम थकबाकी नाही. विवरणाचा दिनांक 24 नोव्हेंबर आहे आणि थकबाकी अंतिम दिनांक 12 डिसेंबर आहे. कार्ड खात्यात केलेल्या व्यवहाराची खाली सूची दिलेली आहे..

| दिनांक | व्यवहार | रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| 10-नोव्हेंबर | कपडे खरेदी | ₹15000 | ₹15000 |
| 15-नोव्हेंबर | एटीएममधून विड्रॉवल | ₹5000 | ₹20000 |
| 15-नोव्हेंबर | रोख अग्रिम रक्कम फी (करासह) | ₹295 | ₹20295 |
| 18-नोव्हेंबर | किराणा खरेदी | ₹6000 | ₹26295 |
| 24-नोव्हेंबर | विवरण दिनांक | थकबाकी असलेली एकूण रक्कम<br>किमान देय रक्कम | ₹26295<br>₹1595 |
| 12-डिसेंबर | | भरपाईचा अंतिम दिनांक | |
| 12-डिसेंबर | कार्ड खात्यातली भरपाई | ₹26295 | - |
| 20-डिसेंबर | वीज बिल भरपाई | ₹1000 | ₹1000 |

24 डिसेंबर (म्हणजेच पुढील विवरण दिनांकापर्यंत) पुढे कोणतीही भरपाई केली गेली नाही. कार्डावरचा थकबाकी व्याज दर 36% प्रति वर्ष, व्याज आणि शुल्क खालीलप्रमाणे लागू केले जाईल:

अ) व्याज शुल्क- शून्य

ब) जीएसटी शुल्क- शून्य

क) एकूण थकबाकी रक्कम- 1000 ₹

त्यामुळे दिनांक 24 डिसेंबरच्या विवरणामधली एकूण थकबाकी रक्कम (अ) + (ब) + (क) = 1000 ₹

V. इतर शुल्के

अ) ओव्हर-लिमिट फी: बँक कार्ड सभासदाने केलेल्या अशा काही व्यवहारांना सेवा भाव म्हणून मंजूरी देऊ शकते, ज्यांच्यामुळे क्रेडिट मर्यादेचे उल्लंघन होऊ शकते. मर्यादे पलिकडील रकमेच्या 2.5% ओव्हर लिमिट शुल्क आकारले जाऊ शकते, जे किमान 500 ₹ च्या अधीन असेल. ओव्हर-लिमिट स्थिती फी किंवा व्याज शुल्कांमुळे देखील येऊ शकते.

ब) परदेशी चलनातील शुल्के: जर व्यवहार भारतीय रुपयांव्यतिरिक्त दुस-या चलनात केला गेला असल्यास, त्या व्यवहाराला भारतीय रुपयांमध्ये रुपांतरीत केले जाईल. रुपांतरण आयडीएफसी फर्स्ट बँकेसह निवाडा केलेल्या व्यवहाराच्या दिनांकावर केले जाईल, हा दिनांक व्यवहार केलेला दिनांक नसेल. जर व्यवहार यूएस डॉलरमध्ये केला गेला नसल्यास, आकारल्या गेलेल्या रकमेला यूएस डॉलरमध्ये रुपांतरीत करुन रुपांतरण यूएस डॉलर्समार्फत केले जाईल, त्यानंतर यूएस डॉलरचे भारतीय रुपयांमध्ये रुपांतरण केले जाईल. जोपर्यंत लागू असलेल्या कायद्याप्रमाणे विशिष्ट दर आवश्यक नसेल, तोपर्यंत डॉलरमधून भारतीय रुपयांमध्ये रुपांतरण व्हीसा किंवा मास्टर कार्डने उपलब्ध करुन दिलेल्या दरांप्रमाणे, स्थितीप्रमाणे, निवाड्याच्या दिनांकावर केले जाईल, जो अशा व्यवहारांवर चलन रुपांतरण घटक परिक्षण किंवा मार्क अपद्वारे वाढवला जातो. कृपया कार्डाप्रमाणे मार्कअप शुल्कांसाठी शुल्कांच्या सूचीपत्राला पहा.

क) फ्युएल व्यवहार सरचार्ज आणि रेल्वे तिकिट बुकिंग सरचार्ज (शुल्कांच्या सूचीपत्रात दिल्याप्रमाणे) केवळ निदर्शक आहेत. हे सरचार्ज प्राप्तिकर्त्याद्वारे (टर्मिनल/पेमेंट गेटवे उपलब्ध करुन देणारी व्यापा-याची बँक) आकारले जातात.

ड) कार्डाच्या संदर्भात कार्ड बदलणे, आउटस्टेशन चेक, शाखा/एटीएममध्ये रोख जमा करणे, न वठलेली पेमेंट्स, ईएमआय रुपांतरण, रोख प्रक्रिया, रिवॉर्ड विमोचन, शेष स्थानांतरण, कर्ज प्रक्रिया, पूर्वसमाप्ती, कार्ड वैधता, लाँज, ॲड-ऑन कार्ड यासारखी लागू होणारी इतर शुल्के शुल्क सूचीपत्रात दिल्यानुसार लागू होतील.

इ) आयडीएफसी फर्स्ट बँकेने कार्ड सभासदाला उपलब्ध करुन दिलेल्या विशिष्ट सेवांसाठी इतर अतिरिक्त शुल्के आणि फी, वेळोवेळी लागू असल्याप्रमाणे कार्ड सभसदाकडून देय असतील.

फ) आयडीएफसी फर्स्ट बँक तिला योग्य वाटल्याप्रमाणे, ग्राहकाला सूचित करुन वेळोवेळी कोणत्याही शुल्कांमध्ये किंवा फीमध्ये बदल करण्याचा किंवा कोणतीही नवीन शुल्के किंवा फीची ओळख करुन देण्याचा अधिकार राखून ठेवते

## 2. मर्यादा

आयडीएफसी फर्स्ट बँक आपल्या सर्वभौम निर्णयाने कार्ड सभासदाच्या क्रेडिट मर्यादेचे आणि रोख विड्रॉवल मर्यादेचे निर्धारण करेल. (ॲड-ऑन कार्ड सभासद हिच मर्यादा वाटून घेतात). क्रेडिट मर्यादा आणि रोख विड्रॉवल मर्यादांबद्दल कार्ड वितरण करताना सूचना दिली जाईल आणि त्यांना मासिक विवरणात दर्शवले जाते. उपलब्ध असलेली क्रेडिट मर्यादेचे गणन कार्डाच्या एकूण मर्यादेमधून वापर केलेली मर्यादा वजा करुन केले जाते. कार्ड सभासदाने कार्डावर क्रेडिट मर्यादेच्या आत कोणतेही कर्ज घेतल्याच्या स्थितीत, कर्जाची थकबाकी असलेली रक्कम कार्डाच्या एकूण क्रेडिट मर्यादेतून वजा करुन उपलब्ध असलेली क्रेडिट मर्यादा मिळवली जाते. रोख मर्यादा क्रेडिट मर्यादेचा उप-विभाग आगे किंवा ती आयडीएफसी फर्स्ट बँकेद्वारे वेळोवेळी स्पष्ट केली जाते. कार्ड सभासद त्याच्या सभासदत्वाचे 12 महिने पूर्ण झाल्यावर, क्रेडिट मर्यादेच्या आणि/किंवा आयडीएफसी फर्स्ट बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या रोख मर्यादेची उजळणी/सुधारणा/ घटीसाठी अर्ज करण्यास पात्र असतो. अशा उजळणीनंतर क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख मर्यादा यापैकी कशातही काही बदल असल्यास, ते आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या सार्वभौम निर्णयाप्रमाणे असतील. आयडीएफसी फर्स्ट बँक आपल्या सार्वभौम निर्णयाने कार्डावरील क्रेडिट मर्यादेची आणि/किंवा रोख मर्यादेची उजळणी करण्यास (सुधारणा किंवा घटीसह) पात्र आहे आणि क्रेडिट मर्यादा आणि/किंवा रोख मर्यादांमध्ये जर सुधारणा असल्यास त्या कार्ड सभासदाच्या अनुमतीने आयडीएफसी फर्स्ट बँकेद्वारे लागू केल्या जातील. क्रेडिट कार्डाचा वापर वेळोवेळी दिलेल्या गेलेल्या मर्यादांची स्वीद्भती मानला जाईल. फर्स्ट प्रायव्हेट क्रेडिट कार्ड सभासदांसाठी बँकेद्वारे वेळोवेळी कार्ड सभासदाच्या बँकेकडे उघड केलेल्या व्यक्तीगत स्त्रोतांच्या, भूतकाळाती खर्च आणि पूर्व परतावा इतिहासाच्या आधारावर अतिरिक्त क्रेडिट मर्यादा निर्दिष्ट केली जाईल. हे दिलेल्या क्रेडिट मर्यादेच्या पलिकडे आणि वर निर्दिष्ट केलेल्या अतिरिक्त बफरच्या स्वरुपात किंवा बँकेला वेळोवेळी योग्य वाटलेल्या प्रकारे असेल.

## 3. व्याज मुक्त कालावधी

व्याज मुक्त (ग्रेस) कालावधी 48 दिवसांहून जास्त नसेल आणि तो व्यवहाराच्या आणि विवरणाच्या दिनांवर आधारुन बदलेल. द्भपया याची नोंद घ्या की, व्याज मुक्त कालावधी जर आधीच्या महिन्याच्या विवरणाची शेष रक्कम अखेरच्या दिनांकावर किंवा त्याआधी पूर्णपणे भरली न गेल्यास लागू होणार नाही.

ग्रेस कालावधीच्या गणनाचे स्पष्टीकरणात्मक उदाहरण

25 ऑक्टोबर 2020 ते 24 नोव्हेंबर 2024 विवरण कालावधीसाठी भरपाईचा अंतिम दिनांक 12 डिसेंबर 2020 असेल. असे गृहित धरु की तुम्ही अंतिम दिनांकाला आधीच्या महिन्याच्या विवरणाच्या थकबाकी रकमेची संपूर्ण भरपाई केली आहे, त्यामुळे ग्रेस कालावधी:

1. दिनांक 2 नोव्हेंबर रोजी केलेल्या खरेदीसाठी, व्याज-मुक्त ग्रेस कालावधी 2 नोव्हेंबर ते 11 डिसेंबर पर्यंतर म्हणजेच 40 दिवसांचा असेल.
2. दिनांक 25 ऑक्टोबर रोजी केलेल्या खरेदीसाठी, व्याज मुक्त ग्रेस कालावधी 25 ऑक्टोबर ते 11 डिसेंबर म्हणजेच 48 दिवसांचा असेल.

## 4. भरपाईचा अंतिम दिनांक (पेमेंट ड्यू डेट) (पीडीडी)

भरपाईचा अंतिम दिनांक विवरणाच्या दिनांकापासून 15 ते 20 दिवसांच्या दरम्यान थकबाकी देय भरपाई इतिहासाच्या आधारावर बदलू शकतो. हा कालावधी बँकेच्या निर्णयानुसार असून तो बदलू शकतो. व्याज मुक्त कालावधी विभागातील उदाहरणाप्रमाणे, विवरण कालावधी 25 ऑक्टोबर ते 24 नोव्हेंबर असून अंतिम दिनांक 12 डिसेंबर आहे, इथे भरपाईचा अंतिम दिनांक कालावधी 18 दिवसांचा आहे.

## 5. बिलिंग आणि विवरण

i. विवरण: कार्ड सभासदाला मासिक तत्वावर बिल केले जाईल आणि भरपाई, व्यवहार आणि शुल्के जर असल्यास त्यांना दर्शवणारे मासिक विवरण महिन्यासाठी पाठवले जाईल, त्यासाठी कार्डाचा 100 रु.पेक्षा जास्त मूल्याच्या व्यवहारांसाठी या काळात उपयोग करणे आवश्यक आहे. विवरण पोस्टाने/ईमेलने/एसएमएस/वॉट्सऍपने किंवा बँकेद्वारे संपर्काच्या दुस-या पध्दतीने वेळोवेळी पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर/ईमेल ऍड्रेसवर/ फोन नंबरवर बँकेच्या नोंदीनुसार पाठवले जाईल.ते नेटबँकिंग किंवा मोबाईल ऍप्लिकेशनवर देखील उपलब्ध आहे. विवरण न मिळाल्यामुळे कार्ड सभासदाच्या या करारनाम्या अन्वये असलेल्या बाध्यता आणि देयतांवर कोणताही परिणाम होत नाही आणि कार्ड सभासद भरपाईच्या अंतिम दिनांकाच्या आत कार्डावरील थकबाकी रकमेचा निवाडा करण्यासाठी जवाबदार असेल. बँक व्यापारी संस्थांकडून मिळवलेल्या सर्व डेबिट्ससाठी आणि उपार्जित केलेल्या शुल्कांसाठी कार्ड खाते डेबिट करेल आणि कार्ड सभासदाने बँकेला केलेल्या सर्व भरपाईंसाठी आणि कार्ड सभासदाच्या नावे केलेल्या कोणत्याही भरपाईसाठी देखील कार्ड खाते क्रेडिट केले जाईल.

ii. देय थकबाकी रक्कम: मासिक विवरणामध्ये किमान थकबाकी रक्कम (एमएडी) आणि थकबाकी असलेली एकूण रक्कम (टीएडी) प्रतिबिंबित होतील. बँक कार्ड सभासदाला रिव्हॉल्विंग क्रेडिट सुविधा देऊ शकते, ज्यात कार्ड सभासद विवरणामध्ये दर्शवलेल्या एमएडीचीच भरपाई करण्याची निवड करु शकतो. भरपाईच्या अंतिम दिनांकावरील मासिक भरपाईमध्ये किमान एमएडीचा आंतर्भाव असेल. आधीच्या विवरणांमधल्या भरपाई न झालेल्या एमएडीला देखील वर्तमान एमएडीमध्ये जोडून वर्तमान विवरणात देय असलेली एमएडीची रक्कम काढली जाईल. जरी किमान थकबाकी रक्कम भरली असून देखील थकबाकी असलेली एकूण रक्कम भरपाईच्या अंतिम दिनांकावर भरली गेली नाही तर, व्याज आकारले जाईल. कार्ड सभासद कदाचित भरपाईच्या अंतिम दिनांकाच्या आधी एकाहून जास्त वेळा बिलिंग कालावधीच्या दरम्यान किमान थकबाकी रकमेहून जास्त रक्कम भरु शकतात किंवा अंतिम दिनांकाच्या आधी कधीही कार्ड खात्यात थकबाकी रकमेची भरपाई करु शकतात.

एमएडीमध्ये सर्व हप्त्यांच्या रकमांची बेरीज, क्रेडिट मर्यादेच्या पलिकडे वापरलेली रक्कम (जर असल्यास), फी, शुल्क आणि थकबाकी असलेल्या रकमेच्या 5% आंतर्भूत असतील. जर थकबाकी असलेली एकूण रक्कम (टीएडी) 100 ₹ पेक्षा कमी असेल तर एमएडी टीएडी एवढा असेल.

कार्ड सभासदाने याची नोंद घेणे आवश्यक आहे की किमान भरपाईची दरमहा भरपाई केल्याने भरपाई पुढची काही वर्षे पुढे ढकलली जाण्यात परिणाम होऊन त्यामुळे त्यांच्या थकबाकीवर व्याजाचे पेमेंट केले जाण्यात पर्यवसन होते.

स्पष्टीकरण: जर कार्ड सभासदाने 5000 ₹ खर्च केला आणि प्रत्येक महिन्याला फक्त किमान थकबाकी रकमेची (2100च्या किमान भरपाईच्या अधीन) भरपाई केली, तर एकूण रकमेचा परतावा करण्यासाठी 3 वर्षे आणि 8 महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे आम्ही असे सूचवू की, जेव्हा शक्य होईल तेव्हा कार्ड सभासदाने किमान थकबाकी रकमेहून जास्त रक्कम भरली पाहिजे. जिला कार्डाच्या थकबाकीसाठी केलेले पेमेंट म्हणून विचारात घेतले जाते. कार्ड सभासदाने कार्डावरील थकबाकीच्या तुलनेमध्ये अतिरिक्त पेमेंट केल्यास, कार्ड खात्यात क्रेडिट शेष असेल. याचे कार्डावर केलेल्या नंतरच्या व्यवहारांवर समायोजन केले जाते. तरीदेखील, या अतिरिक्त क्रेडिट रकमेवर कोणत्याही व्याजाचा दावा करता येऊ शकत नाही. कार्डधारकांना त्याच्या/तिच्या बँकेला कोणतेही पेमेंट करण्यासाठी संपर्क करावा लागतो, पण आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्डवर 48 तासांच्या आत क्रेडिट मिळवता येत नाही.

## 6. भरपाई (पेमेंट्स)

कार्डावर मिळवलेली भरपाई/पेमेंट खालील क्रमाने विविध श्रेणींमध्ये समायोजित केले जाईल:

i. करांसह फी आणि शुल्के

ii. ईएमआय

iii. व्याज शुल्क

iv. रोख अग्रिम रक्कम

v. खरेदी

vi. इतर डेबिट्स

बिल केलेल्या थकबाकी रकमेला बिल न केलेल्या थकबाकींच्या तुलनेमध्ये पेमेंट घप्लिकेशनसाठी प्राधान्य दिले जाईल; पेमेंट ॲप्लिकेशनचा क्रम वर दिल्याप्रमाणेच असेल. मर्चंट रिफंड/कॅशबॅक/व्यवहारांवरचे क्रेडिट ड्यू ईएमआय/रद्द केलेल्या व्यवहारांमध्ये/रिव्हर्सल्स/प्रमोशनल कॅशबॅकमध्ये रुपांतरण केले गेल्यास त्याला कार्डावरील थकबाकीसाठी केलेली भरपाई समजता येणार नाही.

## 7. भरपाईच्या पध्दती

कार्ड खात्यावर केलेली भरपाई खालीलपैकी कोणत्याही पध्दतीने करता येऊ शकते.

i. नेटबँकिंग: जर कार्ड सभासदाकडे आयडीएफसी फर्स्ट बँक खाते असेल, तर तो/ती नेटबँकिंगमार्फत वेबसाइट किंवा मोबाईल ॲप्लिकेशन वापरुन पेमेंट करु शकतो/ते.

ii. आयएमपीएस/एनइएफटी: जर कार्ड सभासदाकडे आयडीएफसी फर्स्ट बँक खाते नसेल, तर तो/ती क्रेडिट कार्डाच्या थकबाकी रकमेला एनइएफटी किंवा आयएमपीएस पेमेंट पध्दतीने त्यांच्या संबंधित बँक खात्यामधून देऊ शकतो/ते.

iii. चेक: ग्राहक आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या शाखांमध्ये उपलब्ध असलेल्या ड्रॉप बॉक्समध्ये चेक टाकून क्रेडिट कार्डाच्या थकबाकीची भरपाई करु शकतो. चेक/डीडी आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्डाच्या 16 आकडी नंबराच्या नावे म्हणजेच, "IDFC FIRST Bank उरीव XXXXXXXXXXXXXXXX" नावाने चेक/डीडी काढू शकतो/ते.

iv. रोख भरपाई: कार्ड सभासद क्रेडिट कार्डाच्या थकबाकी रकमेची आयडीएफसी फर्स्ट बँक शाखांमध्ये रोख रक्कम भरुन भरपाई करु शकतो.

v. स्टँडिंग इनस्ट्रक्शन्स: कार्ड सभासद टीएडी किंवा एमएडी साठी त्याच्या आयडीएफसी फर्स्ट बँक खात्यामध्ये स्टँडिंग इनस्ट्रक्शन निश्चित करु शकतो.

vi. यूपीआय क्यूआर: कार्ड सभासद क्यू–आर कोड आधारीत युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय)पेमेंट करण्यासाठी स्कॅनचा वापर करु शकतो.

vii. यूपीआय: कार्ड सभासद यूपीआय एनेबल्ड ॲपने पेमेंट करु शकतो.

viii. पेमेंट गेटवे: कार्ड सभासद पेमेंट गेटवे निधी स्थानांतरणाने पेमेंट करु शकतात.

ix. जर वरीलपैकी कोणतीही भरपाईची पध्दत विड्रॉ केली गेली/ दुस–या भरपाई पध्दतींची बँकेच्या संकेतस्थळावर भरपाई पध्दतींना अपडेट करण्यामार्फत ओळख करुन दिली जाऊ शकते.

## 8. बिलिंगच्या संदर्भातील वाद

विविरणातील सर्व मजकूर  अचूक आहे आणि जर कार्ड सभासदाने आयडीएफसी फर्स्ट बँकेला वादांची विवरण दिनांकाच्या 30 दिवसांच्या आत आणि व्यवहाराच्या दिनांकापासून 60दिवसांनंतर लेखी सूचना न दिल्यास ग्राह्य मानला जाईल. बिलिंग वाद/मतभेद असल्याच्या स्थितीत, बँक तपासणी करेल आणि अशा व्यवहारांच्या दायित्वाची  पुष्टी देईल. काही विशिष्ट वादांसाठी बँक, आपल्या निर्णयाने तपासणीच्या कालावधी दरम्यान तात्पुरते क्रेडिट देते, जे तपासणीच्या फलिताच्या अधीन राहून लागू असलेल्या शुल्कांसह (शुल्क सूचीपत्रात दिल्यानुसार) रिवर्स केले जाईल. आकारलेला जीएसटी फी आणि शुल्क/व्याजावरील  कोणत्याही वादामध्ये रिवर्स केला जाणार नाही.

## 9. संपर्काचा तपशील

कार्ड सभासद आयडीएफसी फर्स्ट बँकेला खालीलपैकी कोणत्याही मार्गांनी संपर्क करु शकतो:

i. 24 X 7 हेल्पलाइन नंबरवर @ 1860 500 1111 कॉल करुन

ii. आम्हाला येथे पत्र पाठवा: आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
क्रेडिट कार्ड एँड अलाइड सर्विसेस विभाग'
4 था मजला. युनिट क्र.402, प्लॉट क्र. Gen/2/1/F,
माइंडस्पेस ट वर, टीटीसी इंडस्ट्रिअल एरिया, एमआयडीसी शिरवणे,
जुई नगर नवी मुंबई रायगड, महाराष्ट्र 400706

iii. आम्हाला येथे ईमेल करा:banker@idfcfirstbank.com

iv. आम्हाला शंकांमार्फत संपर्क करा आणि आम्हाला नेट बँकिंग/मोबाईल ॲप्लिकेशनच्या विकल्पाने संपर्क करा

## 10. तक्रार निवारण

जर तुम्ही ॲक्सेस चॅनल्समार्फत मिळालेल्या प्रतिसादाने समाधानी नसाल– तर तुम्ही तुमच्या प्रश्नांला प्रमुख/वरिष्ट कस्टमर केअरला खालील पध्दतींनी संपर्क करुन पुढे नेऊ शकता. तुम्ही head.customerservice@idfcfirstbank.comवर ईमेल करु शकता किंवा बँकेला 7 ही दिवशी सकाळी 9:30 ते सायंकाळी 6:00 दरम्यान /1800 209 9771 (टोल फ्री)वर कॉल करु शकता.
तक्रार आणखीन पुढे नेण्यासाठी तुम्ही आमच्या प्रमुख नोडल अधिका–यांना (सुश्री टी अरोरा, आयडीएफसी फर्स्ट बँक लि. बिल्डिंग क्र.2, रहेजा माइंडस्पेस, एमआयडीसी इंडस्ट्रिअल एरिया, शिरवणे, जुईनगर, नेरुळ, नवी मुंबई– 400706 महाराष्ट्र, भारत, लँडमार्क: रहेजा युनिवर्सल किंवा हाँडा सर्विस सेंटर) समस्येचे परिक्षण करण्यासाठी आणि निष्पक्ष निराकरण देण्यासाठी संपर्क करु शकता, तुम्ही PNO@idfcfirstbank.com वर ईमेल करुन किंवा सर्व 7 दिवशी सकाळी 9:30 ते सायंकाळी 6:00 दरम्यान /1800 209 9771 (टोल फ्री)वर कॉल करुन समस्या पुढे नेऊ शकता.
तुम्हाला प्रतिसाद मिळण्याच्या 30 दिवसांच्या आत कृपया तुमच्या शंका/प्रश्न व्यक्त करा आणि तुमचा सेवा विनंती क्रमांक नमूद करा. कार्ड सभासदाला वरील मार्गांनी तक्रार दाखल केलेल्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत कोणताही प्रतिसाद न मिळण्याच्या स्थितीत किंवा कार्ड सभासद दिलेल्या प्रतिसादाबद्दल समाधानी नसल्यास, तो/ती बँकिंग लोकपालांना स्वतंत्र उजळणीसाठी लिहू शकतो/ते. www.idfcfirstbank.com संकेतस्थळाच्या तक्रार निवारण पृष्ठावर पुढील तपशील उपलब्ध आहे. तुमच्या स्थळासाठीच्या बँकिंग लोकपालाचा तपशील देखील शाखांमध्ये प्रदर्शित केला गेला आहे.
अयशस्वी/ विफल व्यवहारांसाठी, तक्रार निवारणात उशीर झाल्यास आणि खाते बंद करण्यात/हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या कार्डांना ब्लॉक करण्यात उशीर झाल्यास ग्राहक भरपाई धोरणामध्ये आणि आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या तक्रार निवारणात परिभाषित केल्यानुसार भरपाई रुपरेषा लागू होईल.

## 11. लीनचा अधिकार

i. बँक, कधीही आणि कोणतीही सूचना न देता, कार्ड सभासदाच्या आणि/किंवा आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ॲड–ऑन कार्ड सभासद/ग्राहकाच्या मालकीच्या कोणत्याही खात्यातील/सुविधेतील/बँकेच्या कस्टडीमधल्या सर्व मोनीजना अधिकारात घेऊ शकते आणि त्यांना सेट–ऑफ करु शकते, जर बँकेच्या मागणीवर किंवा कोणत्याही खात्यातील/सुविधेतील/ बँकेच्या कस्टडीतील थकबाकीच्या स्थितीत, कार्ड खात्यावर किंवा कोणत्याही क्रेडिट सुविधेवर उर्वरीत रक्कम दिलेल्या वेळेत भरली गेली नाही.

ii. उपलब्ध असलेला विमोचन पॉइंट्स बॅलन्स जर व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या पॉइंट्सहून कमी असल्यास विमोचनाचा निवाडा करताना, बँक फरकाच्या रकमेला ग्राहकाच्या कार्ड/खात्यात डेबिट करण्याचा अधिकार राखून ठेवते.

## 12. चूक

जर कार्ड सभासद बिलिंग विवरणात दिलेल्या दिनांकावर किमान थकबाकी रकमेची भरपाई करु शकला नाही तर, त्याला चूक समजले जाईल. कार्ड सभासदाला भरपाईसाठी उशीर होण्याचे शुल्क, वित्त शुल्के आणि शुल्कांच्या सूचीपत्रात दिल्याप्रमाणे लागू होणारी इतर शुल्के भरणे गरजेचे आहे. रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय)द्वारे अधिकृत क्रेडिट इन्फोर्मेशन कंपन्यांना (सीआयसी) केलेल्या मासिक प्रस्तुतीमध्ये कार्डाला विलंबित म्हणून सूचित केले जाईल. भरपाईचा अंतिम दिनांक आणि बिलिंगचा दिनांक यांच्या दरम्यानचा बिलिंग विवरणात दिलेला कालावधी कार्ड सभासदाला डिफॉल्टर सूचित करण्यासाठी सूचना कालावधी म्हणून समजला जाईल. क्रेडिट कार्ड सुविधांचे नियमन करणा–या अटी आणि शर्ती ध्ड–ऑन कार्ड सभासदांना देखील लागू होतील. चूक घडल्याच्या स्थितीत, कार्ड सभासदांना कार्ड खात्यावरील कोणत्याही थकबाकीचा निवाडा करण्यासाठी वेळोवेळी पोस्टाने, फॅक्स, ईमेल, एसएमएस मेसेंजिंग करण्यामार्फत रिमायंडर्स पाठवली जातील आणि/किंवा त्रयस्थ पक्षांची आठवण करुन देण्यासाठी, फॉलो अप आणि थकबाकी संग्रहणासाठी नियुक्ती केली जाईल. अशाप्रकारे नियुक्ती केलेला कोणताही त्रयस्थ पक्ष थकबाकी संग्रहणात आचार संहितेचे संपूर्णपणे

अनुसरण करेल. अधिकृत एजन्सींमार्फत समाविष्ट करण्यात आले आलेले बँकेचे ग्राहक सहाय्य विशेषतज्ञ कार्ड सभसदांना थकबाकी देयांची आठवण करण्यासाठी संपर्क करु शकतात. जर बँक कार्ड सभासदाला संपर्क करु शकली नाही, तर जोडीदार/पालक/कुटुंबातील इतर प्रौढ सभासद/नातेवाईक/सचिव/ लेखापरिक्षक/सहकारी/ कार्ड सभासदाच्या ओळखीची इतर कोणतीही प्रौढ व्यक्ती जी घर/कार्यालय/फोनवर उपलब्ध असेल त्यांच्याकडे निरोप ठेवला जाईल.

कार्ड सभासदाने चूक केल्याच्या घटनेमध्ये बँकेला तिच्या सार्वभौम अधिकाराने या पात्रता असतील–

अ) कार्ड सभासदाच्या सर्व क्रेडिट कार्ड सुविधा काढून घेणे

ब) कार्ड सभासदाला त्याच्या कार्डावरील सर्व थकबाकी रक्कम तात्काळ भरण्यास सांगणे

क) बँकेचा अधिग्रहण अधिकार आणि कोणत्याही मोनीज/ठेवी/कार्ड सभासदाच्या नावाने बँकेत असलेल्या खात्यांना थकबाकी रकमेसाठी सेट–ऑफ कार्यान्वियित करणे.

डिफॉल्ट अहवालाच्या विड्रॉवलची प्रक्रिया आणि थकबाकीचा निवाडा झाल्यानंतर डिफॉल्ट अहवाल विड्रॉ करण्याचा कालावधी.

कार्ड सभासदाचा मृत्यू किंवा कायमस्वरुपी अपंगत्वाच्या स्थितीत, बँक कार्ड खात्यावरील थकबाकीच्या वसूलीसाठी कायदा आणि समातेने आपल्या सार्वभौम निर्णयाप्रमाणे उपलब्ध असलेल्या सर्व विकल्पांना अवलंबण्याचा अधिकार राखून ठेवते, यामध्ये लागू असलेल्या कोणत्याही विमा कव्हरमधून किंवा कार्ड सभासदाचे वारस/ उत्तराधिकारी/व्यवस्थापकांकडून कार्डाची थकबाकी वसूल करण्याचा आंतर्भाव होतो.

बँकेचे ब्युरो रिपोर्टिंग मासिक तत्वावर चालवले जाते. एखाद्या विशिष्ट महिन्यात डिफॉल्टर म्हणून सूचना दिल्यानंतर कोणत्याही थकबाकीचा निवाडा झाल्यावर, स्थिती अद्यनीत केली जा ऊन अद्यनीत स्थितीसह बँकेद्वारे पुढचा अहवाल सादर केला जातो.

## 13. कार्ड सभासदत्व रद्द करणे/रिव्होकेशन/स्थानांतरण

i. बँकेला कधीही banker@idfcfisrtbank.com वर लिहून किंवा 1860 500 1111 हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करुन कार्ड सभासद आयडीएफसी फर्स्ट बँकेचे कार्ड सभासदत्व रद्द करु शकतो. गैरवापर टाळण्यासाठी, कार्डाचे तुकडे करण्याची तसेच होलोग्राम, ईएमव्ही चिप आणि मॅग्नेटिक स्ट्रिप कायमस्वरुपी नष्ट केली असल्याची खात्री करण्याची शिफारस केली जाते. कार्डावरची संपूर्ण थकबाकी रक्कम आणि कर्ज/ईएमआय सुविधा ज्या कार्डासोबत जोडल्या गेल्या आहेत (जर लाभ घेतला असल्यास) त्या तात्काळ देय बनतील. आयडीएफसी फर्स्ट बँकेला सदर कार्डाच्या संदर्भात सर्व थकबाकी रकमेची भरपाई झाल्यावरच कार्ड रद्दिकरण प्रभावी होईल. कोणतीही वार्षिक, प्रवेश, नूतनीकरण फी किंवा इतर अन्य शुल्के जी बिल केली गेली असतील ती कार्ड सभासदाला परत केली जातील.

ii. आयडीएफसी फर्स्ट बँकेला अनैसर्गिक आणि विचित्र व्यवहार पध्दत कार्डाच्या उपयोगात जाणवल्यास, बँक ग्राहकाशी तिच्या नोंदींमध्ये असलेल्या ग्राहकाच्या नोंदणीकृत फोन नंबरवर कार्डावरील व्यवहार वास्तविक आहे का नाही याचे सत्यापन करण्यासाठी संपर्क करण्याचा प्रयत्न करते. बँकेला संपर्क करण्यात अपयश आल्यास, तर कार्ड सभासदाच्या हितासाठी आवश्यक आहे असे बँकेला वाटल्यास आणि सुरक्षेच्या कारणास्तव बँक पुढे सूचना न देता कार्डाच्या उपयोगावर मर्यादा आणू शकते/उपयोग रद्द करु शकते.

iii. आयडीएफसी फर्स्ट बँक कधीही, कोणतीही पूर्व सूचना न देता कार्डाचा उपयोग रद्द करु शकते, जर तिला व्यवसायासाठी किंवा सुरक्षेच्या कारणास्तव तसे करण्याची आवश्यकता वाटली तर हे केले जाते, यामध्ये भरपाई करण्यातील उशीर, क्रेडिट मर्यादेच्या पलिकडला उपयोग, न वठलेला चेक, क्रेडिट कार्डाचा गैरवारप (परदेशी देवाणघेवाण व्यापार, व्यवसाय उपयोग इ.साठी), कार्डाच्या अर्जासह दिशाभूल करणारी किंवा चुकीची माहिती/दस्तऐवज दिल्यास किंवा तत्सम बाबतीत, माहिती किंवा दस्त ऐवजांना संबंधित कायदे/नियमनांप्रमाणे (ओळख दस्तऐवजासह) बँक/आरबीआयच्या नो युअर कस्टमर (केवायसी)/ मनी लॉंडरींग (एएमएल)/कॉबॅटिंग ऑफ फायनान्शिअल टेररिजम (सीएफटी) मार्गदर्शकांना आवश्यक असल्यानुसार प्रस्तुति करण्यात अपयश आल्यास, जर कार्ड सभासद कोणत्याही दिवाणी खटल्यास किंवा गुन्हेगारी दोषात/ •कोणत्याही प्राधिकरणामार्फत, न्यायालय किंवा व्यावसायिक संस्था किंवा असोसिएशनमार्फत केलेल्या कारवाईत सामिल असण्याचा आंतर्भाव होतो.

iv. नियामक मार्गदर्शक, कार्डाचा आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या अटी आणि शर्तीप्रमाणे कार्डाचा वापर होत असण्याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टिने क्रेडिट कार्डाच्यास उपयोगावर बँकेला नियतकालिक तपासण्या करण्याचा अधिकार आहे, ज्यामुळे एका विवरण सायकलमध्ये मंजूर केलेल्या मर्यादेच्या पलिकडे क्रेडिट मर्यादेचा अति वापर होत आहे का, काही निवडक व्यापाऱ्यांकडे अनैसर्गिक किंवा अति वापर होत आहे का, व्यापाऱ्यासोबतची संभाव्य जवळीक आणि/किंवा व्यक्तीगत नसलेल्या/व्यवसाय संबंधित आवश्यकतांसाठी उपयोग, गुणविशेषांचा/ऑफर्स/प्रोग्राम्सचा रिवॉर्ड पॉइंट्स गोळा करण्यासाठी/कॅश बॅकसाठी/ इतर

संबंधित आवश्यकतांसाठी उपयोग, गुणविशेषांचा/ऑफर्स/प्रोग्राम्सचा रिवॉर्ड पॉइंट्स गोळा करण्यासाठी/कॅश बॅकसाठी/ इतर लाभांसाठी अतिवापर/गैरवारप ओळखता येतो. उपयोगाच्या पध्दतींच्या आधारावर, यापैकी कशाचीही बँकेला शंका आल्यास बँक क्रेडिट कार्डावर निर्बंधक कारवाई करु शकते . ही कारवाई तात्काळ केली जाऊ शकते आणि त्यात गुणविशेष/लाभ काढून घेणे त्याचप्रमाणे क्रेडिट कार्ड कायम स्वरुपी रद्द करण्याचा समावेश असू शकतो, पण तो तेवढ्यापुरते मर्यादित नसतो. जर बँकेद्वारे अशी कारवाई केली गेली तर क्रेडिट कार्ड आणि संलग्न गुणविशेष/लाभ परत मिळवण्यासाठी बँकेला योग्य वाटेल अशाप्रकारे वास्तववादी उपयोगाचा समाधानकारक पुरावा देणे ही ग्राहकाची जवाबदारी असेल. आयडीएफसी फर्स्ट बँकेचा निर्णय या संदर्भात अंतिम मानला जाईल आणि तो ग्राहकांसाठी बंधनकारक असेल.

v. कार्ड सभासदाचा मृत्यू किंवा अक्षमता कार्ड सभसदाला त्याचप्रमाणे ॲड–ऑन कार्ड सभासदांना वितरीत केलेले क्रेडिट कार्ड स्वयंचलितपणे रद्द करेल. क्रेडिट कार्ड खाते कोणत्याही शासकीय/नियामक संस्थेच्या सूचनांवरुन रद्द केले जाण्यास पात्र आहे. क्रेडिट कार्ड खात्यातील सर्व थकबाकी रकमा मृत्यू होण्याच्या किंवा अक्षमतेच्या स्थितीत स्थितीप्रमाणे तात्काळ देय बनतील, आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड खात्यावरील थकबाकीच्या वसूलीसाठी कायदा आणि समानतेने आपल्या सार्वभौम निर्णयाप्रमाणे उपलब्ध असलेल्या सर्व विकल्पांना अवलंबण्याचा अधिकार राखून ठेवते, यामध्ये लागू असलेल्या कोणत्याही विमा कव्हरमधून किंवा कार्ड सभासदाचे वारस/ उत्तराधिकारी/व्यवस्थापकांकडून कार्डाची थकबाकी वसूल करण्याचा आंतर्भाव होतो.

vi. जर कार्ड सभासदाचे क्रेडिट कार्ड कधीही वापरले गेले नाही किंवा 365 दिवसांहून जास्त काळ वापरले गेले नाही, तर त्यावरील सर्व लाभ काढून घेतले जातील आणि 30 दिवसांच्या कालावधीत कार्ड सभासदत्व सुरु ठेवण्यासाठी स्पष्ट अनुमती मिळेपर्यंत कार्ड बंद केले जाईल. अशा कार्ड सभासदांना अशा विड्रॉवलची पूर्व सूचना दिली जाईल.

vii. कार्डाच्या रद्दीकरणाच्या/रिव्होकेशनच्या कोणत्याही स्थितीत, कार्डावरील सर्व थकबाकी आणि कार्डाशी निगडीत कर्जे/ईएमआय सुविधा तात्काळ देय बनतील. थकबाकीमध्ये आयडीएफसी फर्स्ट बँकेला करारनाम्याच्या अंतर्गत देय असलेल्या सर्व रकमांचा समावेश होतो, ज्यामध्ये सर्व व्यवहार आणि खात्यावर अजून न आकारल्या गेलेल्या इतर रकमांचा समावेश होतो. कार्ड सभासदांना मासिक विवरण मिळणे सुरु राहिल, ज्यात कार्ड खाते बंद केल्यावर देखील वास्तविक थकबाकी प्रतिबिंबित होईल.

viii. उपरोक्त बाबींसह एंप्लॉई क्रेडिट कार्डाचे वितरण/रद्दीकरण एंप्लॉई क्रेडिट कार्ड गुणविशेषांनी आणि बँक इंट्रानेट पोर्टलवरच्या माहितीनुसार नियमित केले जाईल.

## 14. कार्ड हरवणे/चोरी होणे/ त्याचा गैरवापर होणे

i. कार्ड हरवले, चोरीला गेले, गहाळ झाले, खराब झाले, ड्यू असताना मिळाले नाही, जर कार्ड सभासदाला क्रेडिट कार्डाच्या त्याच्या/तिच्या परवानगीशिवाय उपयोग केला गेल्याची किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला पिन आणि इतर सुरक्षा तपशील माहित पडल्याची शंका असेल तर कार्ड सभासदाने आयडीएफसी फर्स्ट बँकेला 1860 500 1111 24 ताशी क्रमांकावर तात्काळ संपर्क करावा. कार्ड सभासदांना स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर करण्याचा सल्ला दिला जातो, ज्यामुळे कार्ड सभासद बँकेद्वारे आवश्यकता असल्यासवर कधीही त्याची प्रत प्रस्तुत करु शकतात.
सूचना देण्यात उशीर झाल्यास बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ग्राहक भरपाई धोरणामध्ये असल्यानुसार दायित्व निर्धारण केले जाईल.

ii. आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड हरवल्याची सूचना देण्याच्या आधी कार्ड खात्यावर केलेल्या कोणत्याही व्यवहारासाठी जवाबदार असणार नाही आणि कार्ड सभासद त्यासाठी संपूर्ण जवाबदार असेल. एकदा आयडीएफसी फर्स्ट बँकेला हरवण्याची नीट सूचना मिळाली, की कार्ड सभासद कार्ड खात्यावर भविष्यात केलेल्या व्यवहारांसाठी जवाबदार असत नाही.

iii. एखाद्याने कार्ड सभासदाच्या किंवा ॲड–ऑन कार्ड सभासदाच्या परवानगीने पिन मिळवून कार्डाचा गैरवापर केल्याच्या स्थितीत सर्व तोट्यांसाठी कार्डसभासद जवाबदार असेल. जर कार्ड सभासदाने अफरातफरीने कृती केली, तर कार्ड सभासद सर्व तोट्यांसाठी जवाबदार असेल. जर कार्ड सभासदाने योग्य ती काळजी न घेता कृती केल्यास, कार्ड सभासद होणाऱ्या सर्व तोट्यांसाठी जवाबदार असेल.

iv. व्यापारी/सभासद बँकेने रक्कम आकारण्याच्या स्थितीत, जी जरी वादग्रस्त असली अथवा नसली तरी ग्राहकाकडून देय बनते, अशावेळी कार्ड सभासद बँकेला त्याला लागू होणाऱ्या बिलिंग सायकल प्रमाणे भरपाई करण्यासाठी जवाबदार असेल. या व्यतिरिक्त जिथे आयडीएफसी बँकेने पेमेंट केले असेल, तिथे बँक ग्राहकाकडून सदर रक्कम वसूल करण्यास पात्र असते. पुढे

जेव्हा रक्कम वादग्रस्त असते, तेव्हा ग्राहकाला बिलिंग सायकलप्रमाणे पेमेंट करावे लागते आणि तो वादाचा निर्णय लागण्याची वाट पाहू शकत नाही. ग्राहकाचा बँकेशी असलेला वर्तमान संबंध निर्बंधित झाला असला आणि/किंवा कार्ड निलंबीत झाले असले/ कोणत्याही कारणास्तव बंद झाले असले तरी बँकेचा वसूली करण्याचा अधिकार आणि ग्राहकाचे पेमेंट करण्याचे दायित्व वैध आणि औपचारिक असेल.

v. क्रेडिट कार्डासोबत वापरासाठी कार्ड सभासदाला दिलेला पिन (पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर) किंवा कार्ड सभासदाने पिन म्हणून निवडलेली कोणतीही संख्या केवळ कार्ड सभासदालाच माहित असणे आवश्यक आहे. हे कार्ड सभासदाच्या व्यक्तीगत उपयोगासाठी असून याचे स्थानांतरण होऊ शकत नाही आणि तो सक्तीने गोपनीय असतो. पिनची कोणत्याही स्वरुपात, कुठेही किंवा कोणत्याही प्रकारे लेखी नोंद ठेवता कामा नये, त्यामुळे त्रयस्थ पक्ष त्याचा उपयोग करु शकतात. पिन कोणत्याही त्रयस्थ पक्षाला, आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कर्मचाऱ्यांना किंवा व्यापारी संस्थांना कधीही किंवा कसाही मग तो स्वैच्छिक किंवा इतर प्रकारे असो उघड करता कामा नये. आयडीएफसी फर्स्ट बँक आणि/तिचे कर्मचारी कार्ड सभासदाने पिनसोबत केलेल्या कोणत्याही तडजोडीसाठी जवाबदार असणार नाहीत.

vi. आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड सभासदाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तडजोडीच्या जोखमीचा संशय आल्यावर क्रेडिट कार्ड ब्लॉक करण्याचा आणि कार्ड खात्यावरचा कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार टाळण्याचा अधिकार राखून ठेवते. आयडीएफसी फर्स्ट बँक कदाचित, कार्ड सभासद किंवा ॲड–ऑन कार्ड सभासदाला संदर्भ न देता पोलिस किंवा इतर योग्य प्राधिकरणांना कार्ड किंवा पिन हरवण्याबद्दल, त्याची चोरी किंवा गैरवापर होण्याबद्दल तिला योग्य वाटणारी माहिती देऊ शकते.

vii. एकदा कार्ड हरवल्याचे सूचित केले गेले की, कार्ड सभासदाने त्यानंतर जर ते सापडले तर त्याचा कोणत्याही परिस्थितीत उपयोग करता कामा नये. जर ते सापडले, तर त्याला कापून त्याची विल्हेवाट लावावी, होलोग्राम, इएमव्ही चिप आणि मॅग्नेटिक स्ट्रीप स्थायीस्वरुपी नष्ट करण्याची खात्री करुन घ्यावी. ॲड–ऑन कार्ड ही प्राथमिक कार्डावर दिलेली विस्तारीत सुविधा असल्यामुळे, जेव्हा प्राथमिक कार्ड हरवल्याची सूचना मिळते तेव्हा ॲड–ऑन कार्ड अवैध ठरते. त्याचप्रमाणे जर ॲड–ऑन कार्ड हरवल्याची सूचना दिली जाते तेव्हा, प्राथमिक कार्ड आणि इतर ॲड–ऑन कार्डे अवैध होतात.

## 15. जाहिरीकरण

i. आयडीएफसी फर्स्ट बँकेने आरबीआयने अधिकृत केलेल्या क्रेडिट इन्फोर्मेशन कंपन्यांसोबत (सीआयसी) टाय–अप केला आहे आणि ती वर्तमान शेष रक्कम, क्रेडिट कार्डाशी जोडलेल्या कर्ज/ईएमआय सुविधा (जर असल्यास), क्रेडिट कार्ड/कर्जाची थकबाकी असलेली रक्कम, पेमेंट इतिहास इ.चा भौगोलिक तपशीलासह आंतर्भाव करत पण त्यापुरते मर्यादित न राहता या संस्थांना मासिक तत्वावर क्रेडिट इन्फोर्मेशन कंपनीज (नियमन) अधिनियम 2005 अन्वये क्रेडिट माहिती शेअर करेल. सीआयसी केवळ वास्तविक क्रेडिट तपशील उपलब्ध करुन देतात आणि क्रेडिट द्यावे की नाही यावर मत, संकेत किंवा टिप्पणी देत नाहीत.

ii. आयडीएफसी फर्स्ट बँक दोषी ग्राहकाची सीआयसीला सूचना देण्याचा अधिकार राखून ठेवते, कार्ड सभासदाने उपस्थित केलेल्या बिलिंग विवादाचे बँकेने आधी अवैध विवाद म्हणून स्पष्टीकरण देण्याच्या किंवा कार्ड सभासदामार्फत कट–ऑफ दिनांकानंतर, बँकेद्वारे परिभाषित केल्यानुसार विवाद उपस्थित करण्याच्या स्थितीत आणि/किंवा पिन किंवा वन टाइम पासवर्डचा उपयोग केला गेलेल्या सुरक्षित व्यवहारांच्या संदर्भातील विवादांमध्ये देखील बँक अशी सूचना देऊ शकते.

iii. आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड खात्याचा तपशील कायदेशीर प्राधिकरणांना, आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देईल. जर कार्ड सभासदाने आयडीएफसी फर्स्ट बँकेने व तिच्या भागीदाराने दिलेल्या को–ब्रँड कार्डाचा लाभ घेतला असल्यास, रिवॉर्ड प्रोग्राम्स, पोर्टफोलिओ स्टॅटिस्टिकल विश्लेषण इ.च्या कार्यान्वयासाठी लागणाऱ्या आवश्यक माहितीला आंतर्भूत करत, पण त्यापुरते मर्यादित न राहता माहिती को–ब्रँड भागीदाराला दिली जाईल.

iv. आम्हाला कार्ड सभासदाला हे देखील सूचित करावेसे वाटते की, आयडीएफसी फर्स्ट बँक, आपल्या सार्वभौम निर्णयाने कार्ड सभासद आणि बँकेचा प्रतिनिधी यांच्यातील किंवा परताव्याच्या वसूलीशी संबधित विशिष्ट संवादांना किंवा बँकेला योग्य वाटत असल्यानुसार इतर संवादांना रेकॉर्ड करु शकते.

v. आयडीएफसी फर्स्ट बँक आयडीएफसी फर्स्ट बँकेने नियुक्त केलेल्या सेवा प्रदात्याला; मग तो भारतात असो वा परदेशात असो आणि आयडीएफसी फर्स्ट बँक समुहातील संस्था असो अथवा नसो किंवा एखादा त्रयस्थ पक्ष असो आपल्या सार्वभौम निर्णयाने, लागू असणाऱ्या नियामक मार्गदर्शकांप्रमाणे क्रेडिट कार्ड कार्यांशी संबंधित कोणत्याही कृती निर्दिष्ट करण्याचा अधिकार देखील राखून ठेवत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक कार्ड सभासद/ॲड–ऑन कार्ड सभासद खात्याचा /निवेदनाचा तपशील अशा सेवा प्रदात्यांना क्रेडिट कार्ड कार्यांशी संबंधित कोणत्याही कृतींसाठी कोणत्याही विशिष्ट परवानगीशिवाय उपलब्ध/शेअर करु शकते. आयडीएफसी फर्स्ट बँक/समुहातील कंपन्या फोटोसह निवेदनाचे फॉर्म आणि त्यांच्यासोबत दिलेल्या दस्तऐवजांना ठेवून घेण्याचा आणि त्यांना परत न करण्याचा अधिकार राखून ठेवतात.

vi. आयडीएफसी फर्स्ट बँक वेळोवेळी विविध उत्पादन/गुणविशेष/प्रमोशनल ऑफर्सची माहिती देत असते, ज्याचा कार्ड सभासदांना लक्षणीय लाभ होऊ शकतो आणि त्यासाठी त्रयस्थ पक्ष एजन्सींचा उपयोग करु शकते. जर कार्ड सभासदाला अशा सेवांसाठी आयडीएफसी फर्स्ट बँकेकडून कोणतेही थेट विपणन, एसएमएस, ईमेल्स किंवा टेलिफोन कॉल्स नको असतील, तर कार्ड सभासद 24 ताशी हेल्पलाइनवर कॉल करु शकतो किंवा बँकेला सूचना देऊ शकतो. याऐवजी कार्ड सभासद बँकेच्या वेबसाइटवर लॉग ऑन करु शकतो आणि डू नॉट डिस्टर्ब सेवेसाठी नोंदणी करु शकतो. कार्ड सभासदाला क्रेडिट कार्डाच्या महत्वाच्या गुणविशेषांच्या संदर्भात संप्रेषण मिळणे सुरु राहिल.

vii. कार्डावर कॉम्प्लिमेंटरी विमा कव्हर असलेल्या क्रेडिट कार्ड व्हेरिएंट्सची निवड करा. पॉलिसी कव्हरेज क्रेडिट कार्ड सेट करण्याच्या दिनांकापासून सुरु होते. अधिक माहिती आणि अटी व शर्तींसाठी कृपया आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संकेतस्थळाला भेट द्या.

## 16. एफइएमए (फॉरिन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट)ला आंतर्भूत करुन इतर महत्वाची माहिती

i. क्रेडिट कार्ड भारतात तसेच परदेशात उपयोगासाठी वैध आहे. पण ते नेपाळ आणि भूतानमध्ये फॉरिन एक्सचेंज भरपाईसाठी वैध नाही.

ii. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांचा उपयोग लॉटरी तिकिटे, प्रतिबंधित मासिके, स्वीपस्टेक्समध्ये सहभाग, फॉरिन एक्सचेंजच्या ड्रॉवलची परवानगी नसलेल्या कॉल बँक सेवांची आणि/किंवा अशा घटक/सेवांची भरपाई करण्यासाठी करता येत नाही.

iii. भारताबाहेर व्यवहार करण्यासाठी कार्डाचा उपयोग लागू असलेल्या कायद्यांप्रमाणे केला जाणे आवश्यक आहे, ज्यात आरबीआयची एक्सचेंज कंट्रोल नियमने आणि फॉरिन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट 1999चा समावेश होतो आणि असे करण्यात अपयश आल्यास, कार्ड सभासद दंडात्मक कारवाईसाठी पात्र असेल.

iv. इंटरनेट ट्रेडिंग पोर्टल्समार्फत फॉरिन एक्सचेंज व्यापारासाठी अनुमती नाही. उल्लंघन किंवा अनुसरण करण्यात आलेल्या अपयशाच्या कोणत्याही घटनेमध्ये, कार्ड सभासद दंडात्मक कारवाईसाठी आणि/किंवा कार्डाच्या बंदीसाठी पात्र होऊ शकतो.

v. आयडीएफसी फर्स्ट बँक एनआरइ/एनआरओ खात्यामधून केवळ एसआरआय लोकांसाठी ऑटोपे माध्यमाने 100% भरपाई अनिवार्यपणे केली जाणे आवश्यक आहे.

vi. पक्ष सहमत आहेत की इथे दिलेल्या आणि/किंवा कार्डाच्या वापरासाठीच्या अटी व शर्तींबद्दलच्या कोणत्याही समस्यांच्या संदर्भातील वादांना मुंबई, भारत येथील न्यायालयांच्या अनन्य न्यायाधिकरणाला संदर्भित केले जाईल आणि त्यांचे भारतातील कायद्यांप्रमाणे नियमन केले जाईल आणि त्यांचा अर्थ लावला जाईल. कार्ड सभासद पुढे पोचपावती देत आहे की, बँक आपल्या सार्वभौम निर्णयाने, बँकेने लवाद आणि सामंजस्य अधिनियम 1996च्या तरतुदींच्या सुधारणेप्रमाणे किंवा पुन:व्यवस्थापनाप्रमाणे नियुक्त केलेल्या एकल लवादाकडे विवाद घेऊन जाण्याची निवड करु शकते. लवादाची कारवाई इंग्रजी भाषेत होईल.लवादाने मंजूर केलेले अवॉर्ड पक्षांसाठी अंतिम आणि बंधनकारक असेल. लवादाची कारवाई दिल्ली/मुंबई/चेन्नई/कोलकता आणि/किंवा बँकेच्या सार्वभौम निर्णयाने सूचित केलेल्या इतर कोणत्याही स्थळावर आयोजित केली जाईल. किंवा लवादाची कारवाई व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने देखील केली जाऊ शकते. न्यायाधिकरणाने आदेश दिलेल्या कोणत्याही सुनावणीला हजर राहण्यासाठी खालील बाबी लागू होतील.

अ) अशी कोणतीही सुनावणी न्यायाधिकरणाच्या आदेशावरुन व्हिडिओ कॉन्फरन्सने घेतली जाईल;

ब) पक्ष सहमत आहेत की, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेतलेल्या या सुनावणीनंतर घेतलेल्या निर्णयावर, आदेश किंवा न्यायाधिकरणाच्या अवॉर्डवर कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही.

vii. कार्ड सभासद सहमत आहे की कोणत्याही वेळी असे लक्षात आले की कोणत्याही क्रेडिट सुविधेच्या संदर्भात बँकेला थकबाकी देय आहे, अशा स्थितीत बँकेला अशा कोणत्याही/सर्व सुविधांच्या बाबतीत कोणतीही पूर्व सूचना न देता नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट (एनओसी) थांबवून ठेवण्याचा पूर्ण अधिकार असेल.

viii. आयडीएफसी फर्स्ट बँक, तिचे कर्मचारी, एजंट्स किंवा कंत्राटदार कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा परिणामी तोट्यासाठी किंवा क्षतीसाठी जवाबदार नसतील, ज्यामध्ये महसूलाची, नफ्याची, व्यवसायाची, कंत्राट, अपेक्षित बचत किंवा प्रतिष्ठेची क्षती, सॉफ्टवेअरचा आंतर्भाव करत कोणत्याही साधनाच्या उपयोगाची किंवा मूल्याची क्षती समाविष्ट होते, पण ती त्यापुरती मर्यादित नसते, ती अपेक्षित असो अथवा नसो, वापरकर्त्यामार्फत किंवा कोणत्याही मार्फत सहन केली जाते, जी विनंती मिळण्यात व प्रक्रिया होण्यात झालेल्या त्याचप्रमाणे प्रतिक्रिया तयार करण्यात आणि देण्यातल्या कोणत्याही उशीराच्या, हस्तक्षेपाच्या, रद्दीकरणाच्या, ठराव किंवा बँकेच्या त्रुटीच्यामुळे किंवा वापरकर्त्याच्या टेलिकम्युनिकेशन साधनाला दिलेल्या आणि तिथून आलेल्या कोणत्याही माहिती किंवा संदेशाच्या, बँक यत्रणा किंवा कोणत्याही सेवा प्रदात्याच्या आणि/किंवा सुविधा देण्यासाठी आवश्यकता म्हणून अशा सेवा देणाऱ्या कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या नेटवर्कच्या अपयशामुळे, उशीरामुळे, हस्तक्षेप, रद्दीकरण, मर्यादा किंवा त्रुटीमुळे संभवते.

ix. आयडीएफसी फर्स्ट बँक बँकिंग कोड्स 6. स्टँडडर्स बोर्ड्स ऑफ इंडिया (बीसीएसबीआय)ची सभासद आहे. बीसीएसबीआय कोडचा तपशील आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.